**SEC4-K : शैक्षणिक लेखन व संशोधन प्रकल्प आणि हिंसा समजून घेऊन हिंसेचे उपशमन करणे**

---

**सत्र ६**

# उद्दिष्टे (Objectives)

1. विद्यार्थ्यांना हिंसाचाराची संकल्पना, त्याचे विविध प्रकार आणि सामाजिक संदर्भातील स्वरूप समजावून देणे.
2. समाजातील हिंसाचाराच्या निर्मितीमागील कारणे (विषमता, पितृसत्ता, राजकारण, माध्यमे, जागतिकीकरण इ.) यांचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करून विश्लेषणात्मक समज विकसित करणे.
3. हिंसाचार प्रतिबंधासाठी उपलब्ध कायदे, शासन व नागरी समाजाची भूमिका तसेच शांतता निर्माण करण्याच्या उपाययोजनांची माहिती देणे.

# अपेक्षित परिणाम (Expected Outcomes)

1. विद्यार्थी हिंसाचार, सामाजिक संघर्ष आणि संबंधित संकल्पना स्पष्टपणे समजून घेऊन त्यांचे वर्गीकरण करू शकतील.
2. विद्यार्थी हिंसाचाराच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक कारणांचे विश्लेषण करू शकतील.
3. विद्यार्थी कायदे, सरकारी योजना आणि नागरी समाजाच्या उपक्रमांच्या माध्यमातून हिंसाचार प्रतिबंधासाठी योग्य उपाय सुचवू शकतील.

**४. हिंसाचार – एक सामाजिक प्रश्न**

१. हिंसाचार, सामाजिक संघर्ष, दुरुपयोग, अवहेलना / मानखंडणा, छेडछाड, गुंडगिरी आणि झुंडबळी (जमावाकडून होणाऱ्या हत्या) या संकल्पना

२. हिंसाचार एक सामाजिक प्रश्न (हिंसाचारावरील समाजशास्त्रीय परिप्रेक्ष्य)

**५. हिंसाचाराची निर्मिती आणि संदर्भ**

१. समाजात हिंसा का घडते? (हिंसेच्या परंपरांची सामाजिक निर्मिती, विषमता / असमानता, रचित बातम्या, धार्मिक मूलतत्त्ववाद, राजकीय पक्ष, पितृसत्ताक, नवउदारमतवादी जागतिकीकरण व बाजारपेठा), कोविड-१९ च्या विशेष संदर्भात तसेच महामारीच्या सावटामध्ये घडलेल्या हिंसा

२. हिंसा एक जटिल समस्या : हिंसाचाराचे प्रकार (लिंगभाव, एल.जी.बी.टी.क्यू. आणि कौटुंबिक हिंसाचार, संस्कृती, बालक, जात-धर्म-प्रदेश आधारित राष्ट्रवाद व हिंसाचार)

**६. तळ / निम्नतम / खालच्या स्तरावर हिंसेचा सामना करताना..**

१. हिंसाचार आणि हिंसाचाराशी संबंधित कायदे (विशाखा कायदा, घरगुती हिंसाचार कायदा-२००५, फौजदारी कायदा दुरुस्ती अधिनियम-२०१३, इत्यादी प्रमुख कायदे)

२. शासन, नागरी समाज आणि हिंसे संबंधित कारवाया – महिलांसाठीचे गुन्हे नोंदणी कक्ष, अंधश्रद्धा-विरोधी आणि काळी जादूटोणा कायदा, महात्मा गांधी तंटा मुक्ती योजना), बिगर-शासकीय संस्थांचा प्रसार आणि कार्यकृती, शाश्वत विकास ध्येय आणि चळवळी

३. सखोल अभ्यास – हिंसा शमविण्याच्या पद्धतींद्वारे परस्पर तथा आंतर-वैयक्तिक पातळीवर हिंसाचाराचे निरीक्षण करताना..

४. हिंसाचार संपुष्टात आणताना : सामाजिक, राजकीय आणि सामुदायिक पातळीवरील प्रतिसाद